**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार, दिनांक १९ मार्च २०२४**

**ठळक बातम्या**

1. **लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याच्या मतदानाची अधिसूचना उद्या जारी होणार.**
2. **काँग्रेस कार्यकारिणीच्या नवी दिल्लीतील बैठकीत पक्षाच्या जाहीरनाम्यावर व्यापक विचारमंथन.**
3. **वंचित बहुजन आघाडीतर्फे काँग्रेसला ७ लोकसभा मतदारसंघामधे पाठिंबा देण्याबाबत पत्र.**
4. **गडचिरोली जिल्हयाच्या कोलामार्का जंगलातील चकमकीत ४ नक्षलवादी ठार, पोलीस विभागाची मोठी कामगिरी.**

   **आणि**
5. **नागपुरात मुसळधार पावसाची हजेरी, पूर्व विदर्भात बहुतांश जिल्हयात वादळीवाऱ्यासह गारपीटीची शक्यता.**

*****

मतदानाची अधिसूचना

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याच्या मतदानाची अधिसूचना उद्या जारी होणार आहे. पहिल्या टप्प्यात १९ एप्रिलला १७ राज्य आणि चार केंद्रशासित प्रदेशातल्या १०२ जागांसाठी मतदान होणार आहे. यामध्ये महाराष्ट्रातल्या रामटेक, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर, आणि चंद्रपूर या पाच मतदारसंघांचा समावेश आहे. याशिवाय तामिळनाडुमधल्या ३९, राजस्थान १२, उत्तर प्रदेश आठ, मध्य प्रदेश सहा, उत्तराखंड आणि आसाममधल्या प्रत्येकी पाच, बिहार चार, पश्चिम बंगाल तीन, अरुणाचल प्रदेश, मणिपूर, मेघालयमध्ये प्रत्येकी दोन, तर छत्तीसगढ, मिझोराम, नागालँड, सिक्कीम, त्रिपुरा, अंदमान आणि निकोबार, जम्मू काश्मीर, लक्षद्विप आणि पुदुच्चेरी इथल्या प्रत्येकी एका जागेचा समावेश आहे. उमेदवारांना येत्या २७ तारखेपर्यंत अर्ज दाखल करता येतील. उद्या दिनांक 20 मार्चपासून नामनिर्देशन पत्र भरण्याची प्रक्रिया सुरू होईल.

काँग्रेस कार्यसमिती बैठक

काँग्रेस कार्यकारिणीच्या नवी दिल्लीत झालेल्या बैठकीत लोकसभा निवडणुकीसाठीच्या पक्षाच्या जाहीरनाम्यावर व्यापक विचारमंथन झाले असल्याची माहिती मल्लिकार्जुन खर्गे यांनी दिली. किसान न्याय, युवा न्याय, नारी न्याय, श्रमिक न्याय आणि हिस्सेदारी न्याय हे भारत जोडो न्याय यात्रेचे ५ स्तंभ आहे. यातून प्रत्येक घटकाच्या विकासासाठी न्यायरूपी ५ ठळक आश्वासनं देऊ करण्यात आली आहेत. 1926 पासून काँग्रेस पक्षाचा जाहीरनामा "विश्वास आणि वचनबद्धतेचा दस्तऐवज" म्हणून ओळखला जातो. देश आस्थेने बदलाची मागणी करत आहे. सध्या भाजप सरकारकडून जी हमी दिली जात आहे, ती 2004 च्या भाजपच्या "इंडिया शायनिंग" घोषणेप्रमाणेच असेल. आपल्या जाहीरनाम्यात विविध राज्यांमध्ये अधिकाधिक लोकांपर्यंत नेण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रत्येक घरापर्यंत पोहचाव अस आवाहन त्यांनी यावेळी केलं. कार्यसमितीच्या बैठकीनंतर खरगे यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीची देखील बैठक होणार आहे. यामध्ये पक्षाच्या उर्वरित उमेदवारांची नावं निश्चित केली जातील. काँग्रेसनं आतापर्यंत दोन वेगवेगळ्या याद्यांमधून एकूण ८२ उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत. दरम्यान, काँग्रेस नेते राहुल गाधी यांच्या मुंबईतल्या सभेमुळे राज्य सरकार घाबरलं आहे, असं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटलं आहे. ते काल मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. या सभेदरम्यान राहुल गांधी यांनी सामाजिक न्यायाची भूमिका घेऊन दिलेल्या २५ हमी पूर्ण करण्यासाठी काँग्रेस पक्ष प्रयत्नशील आहे असं देखील ते म्हणाले. तर शिवाजी पार्कवरील इंडी आघाडीच्या सभेनंतर जुन्या शिवसैनिकांच्या मनात खदखद निर्माण झाली आहे. ही खदखद लोकसभेत दिसून येईल, अशी टीका भाजप नेते, आमदार नितेश राणे यांनी आज पत्रकार परिषदेत केली.

प्रकाश आंबेडकर

महाविकास आघाडीतल्या २ प्रमुख पक्षांवरचा आपला विश्वास उडाला असला, तरी काँग्रेसला मात्र ७ लोकसभा मतदारसंघामधे पाठिंबा देणार असल्याचं वंचित बहुजन आघाडीनं स्पष्ट केलं आहे. याबाबत वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांना पत्र लिहिलं आहे. माविआचे नेते बैठकांमधे आमच्या प्रतिनिधीचं म्हणणं ऐकायला तयार नाहीत. मात्र भाजप सरकारचा पराभव करणं हाच वंचित बहुजन आघाडीचा प्रधान हेतू असल्यानं काँग्रेसला पाठिंबा देण्याचा निर्णय पक्षानं घेतला आहे. त्यामुळे काँग्रेस राज्यात लढवणार

असणाऱ्या सात मतदार संघांची नावं आपल्याला कळवावीत, असं या पत्रात म्हटलं आहे.

गडकरी सभा उत्तर नागपूर

उत्तर नागपूर हा शहराचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे आणि या परिसराचा सर्वांगीण विकास हेच आपलं ध्येय आहे, असं प्रतिपादन भाजपचे वरिष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज केलं. टेका नाका येथील प्रल्हाद लॉनवर उत्तर नागपूर भाजप बुथ शक्ती केंद्र आणि पदाधिकाऱ्यांचे संमेलन काल आयोजित करण्यात आले होते. कार्यकर्त्यांच्या परिश्रमामुळे उत्तर नागपुरातून चांगली आघाडी मिळेल, असा विश्वास गडकरी यांनी व्यक्त केला. त्यासाठी दहा वर्षांत झालेली विकास कामे लोकांपर्यंत पोहोचवावी लागतील, असही ते म्हणाले. याशिवाय, दक्षिण नागपूर भाजपा बुथ शक्ती केंद्र आणि पदाधिकाऱ्यांच्या संमेलनात बोलताना ते म्हणाले 'नागपुरातील मिहान हे खऱ्या अर्थानं एव्हिएशन हब झालं आहे. मिहानमधील कंपन्यांमध्ये आतापर्यंत नागपुरातील ६८ हजार तरुणांना नोकऱ्या लागल्या आहेत. शहरातील सगळे रस्ते काँक्रिटचे होत आहेत. पण विकासाचा हा केवळ ट्रेलर आहे. पिक्चर अभी बाकी है,' या शब्दांत गडकरी यांनी नागपूरच्या चौफेर विकासाचा निर्धार व्यक्त केला.

नागपूर व रामटेक लोकसभा

नागपूर व रामटेक लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रत्येक गावपातळीवर मतदान प्रक्रियेसाठी मोठ्या प्रमाणात लागणाऱ्या मनुष्यबळाचे नियोजन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आलं आहे. सुमारे 32 हजार शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांना विविध टप्प्यात प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात आले आहे. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष 50 हजारापेक्षा अधिक मनुष्यबळ निवडणूक प्रक्रियेत आहे. 75 टक्क्यापेंक्षा अधिक मतदान व्हाव यादृष्टीन जिल्हा निवडणूक विभागातर्फे तयारी केली जात असून, याबाबत स्वीप उपक्रमाच्या माध्यमातून गावपातळीवर जनजागृती केली जात असल्याची माहिती डॉ. विपीन इटनकर यांनी दिली. तथापि काही अधिकारी-कर्मचारी हे जबाबदारी टाळण्यासाठी वैद्यकीय प्रमाणपत्राचा आधार घेऊन प्रशासकीय नियोजनात अडथळा निर्माण करतात. निवडणुकी सारख्या अत्यंत महत्त्वपूर्ण प्रक्रियेत जर कोणी खोटी वैद्यकीय प्रमाणपत्रे सादर केल्याचे पडताळणी नंतर आढळले तर अशा व्यक्तींविरुद्ध कठोर कारवाई करु असा इशारा जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी दिला आहे.

नक्षलवादी ठार

गडचिरोली जिल्ह्यात अहेरी तालुक्यातल्या रेपनपल्ली नजीकच्या कोलामार्का जंगलात आज पहाटे पोलिसांशी झालेल्या चकमकीत चार नक्षलवादी ठार झाले. वर्गिस, मगटू, कुरसंग राजू आणि कुडीमेट्टा व्यंकटेश अशी मृत नक्षल्यांची नावं असून, चारही जण तेलंगणा राज्यातले आहेत. वर्गीस हा नक्षल्यांच्या विभागीय समितीचा सचिव, तर मगटू हा क्षेत्र सचिव पदावर कार्यरत होता. त्यांच्यावर एकूण ३६ लाखांचं बक्षीस होतं. काल रात्री नक्षल्यांच्या तेलंगणा समितीचे काही सदस्य अहेरी तालुक्यात दाखल झाले होते. त्यानंतर पोलिसांनी सी-60 पथकाचे जवान पाठवून नक्षलविरोधी अभियान राबवलं. आज पहाटे नक्षलवादी आणि पोलिसांमध्ये चकमक उडाली. पोलिसांनी घटनास्थळाहून एक एके 47, एक कार्बाइन आणि दोन देशी बनावटीचे पिस्तूल, तसंच इतर साहित्य ताब्यात घेतलं आहे. घटनास्थळ परिसरात नक्षलविरोधी अभियान तीव्र करण्यात आल्याचं पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी सांगितलं.

उद्धव ठाकरे-यवतमाळ दौरा

'शेतकरी आंदोलकाच्या नावाखाली अराजकता' असं वक्तव्य संघाचे सरकार्यवाह दत्तात्रय होसबळे यांनी केलं असून याप्रकारचं हिंदुत्व मला मान्य नाही' अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली आहे. यवतमाळच्या उमरखेड मध्ये जनसंवाद मेळाव्याला त्यांनी आज संबोधित केलं. 'मोदीनी शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट केलं नाही, दिलेली आश्वासनं पूर्ण केली नाही', असं सांगत ठाकरेंनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही टीकास्त्र सोडल. निवडणूक रोख्यांसंदर्भात देखील त्यांनी भाजपला घेरलं.

राज ठाकरे

मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी आज सकाळी नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांची भेट घेतली. अमित शाह यांच्या घरी झालेल्या भेटीच्या वेळी भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे उपस्थित होते. राज ठाकरे महायुतीमध्ये सहभागी झाले तर त्यांचं स्वागत आहे, अशी प्रतिक्रिया भाजपाच्या अनेक नेत्यांनी दिली आहे.

हवामान

नागपुरात आज संध्याकाळी विजांच्या कडकडाटासह जोरदार पर्जन्यवृष्टी झाली. सकाळ पासून नागपुरात अधून मधून ढगाळ वातावरण होतं, दुपार नंतर सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाला सुरवात झाली. दरम्यान, पूर्व विदर्भातील गडचिरोली शहरासह जिल्ह्याच्या काही भागात आज दुपारी वादळ आणि मेघगर्जनेसह पाऊस पडला. दुपारी पावणेतीन वाजताच्या सुमारास रिमझिम पावसाने हजेरी लावली. आरमोरी, धानोरा

इथंही हलक्या स्वरूपाचा पाऊस पडला. गडचिरोली आणि आरमोरी इथं काही काळ वीजपुरवठा खंडित झाला होता. चंद्रपूर जिल्ह्यातील बहुतांश भागात आज दुपारी दोनच्या सुमारास तासभर मुसळधार पाऊस झाला. आगामी काही तासात विदर्भातील अकोला, बुलढाणा आणि वाशीम वगळता सर्व जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडण्याची तसच  वादळी वाऱ्यासह गारपीट होण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. आज नागपूर, भंडारा, आणि  गोंदिया इथं पावसाचा ऑरेंज अलर्ट या आधीच जारी करण्यात आला आहे. दरम्यान विजांच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा आणि गारपिटमुळे होणाऱ्या नुकसानीची काळजी घेण्याचं  आवाहन वर्धा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं केलं आहे.

*****